दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३३४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२७ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

आज राज्यात ८,३३३ नव्या कोरोना रुग्णांचे निदान, ४८ मृत्यू

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यातील कोरोना बाधित रुग्णांची झपाट्याने होणारी वाढ कायम असून आज दिवसभरातील रुग्णवाढीचा आकडा कालच्या तुलनेत केवळ ३६९ ने कमी आहे. आज दिवसभरात तब्बल ८ हजार ३३३ इतक्या नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. काल ही संख्या ८ हजार ७०२ इतकी होती. तर, आज ४ हजार ९३६ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ही संख्या ३ हजार ७४४ इतकी होती.

या बरोबरच राज्यात दिवसाला मृत्युमुखी पडणाऱ्या रुग्णसंख्येत कालच्या तुलेनेत घट झाली आहे. आज राज्यात एकूण ४८ करोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. काल ही संख्या ५६ इतकी होती.

आजची मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या लक्षात घेता सध्या राज्यातील मृत्यूदर २.४३ टक्के इतका आहे. राज्यात आजपर्यंत एकूण २० लाख १७ हजार ३०३ करोनाबाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९४.३५ टक्के इतके झाले आहे.

जेएनपीटीची जहाजे रोखणाऱ्या ग्रामस्थांना अटक व सुटका

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

मागील ३२ वर्षापासून पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाड्याचे नव्याने पुनर्वसन न केल्याने या कोळीवाड्यातील ग्रामस्थांनी शुक्रवार दि२६ रोजी समुद्रामध्ये जेएनपीटी बंदरात येणारी जहाजे रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेकडो हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थांनी व कोळी बांधवानी आपल्या पारंपारिक होड्या जेएनपीटीकडे येणाऱ्या जहाजांच्या मार्गात आडव्या घालून जेएनपीटीचा समुद्र रोखून धरला होता. त्यामुळे जेएनपीटी आणि पोलिस प्रशासनाची प्रचंड ताराबळ उडाली होती. पोलिसांनी काही ग्रामस्थांना समुद्र किनाऱ्यावरच रोखून ताब्यात घेतले होते तरी देखील शेकडो महिला आणि तरूणांनी समुद्रात जाऊन जेएनपीटीचा मार्ग रोखून धरला होता. पोलसांनी जवळपास चारशे ते पाचशे ग्रामस्थांना पोलिसांनी अटक करून जेएनपीटी

टाऊनशिप येथिल क्लब हाऊस मध्ये डांबून ठेवले. ग्रामस्थांनी गनिमी काव्याने जेएनपीटीच्या समुद्री चॅनलमध्ये आपल्या होड्या आडव्या घालून रस्ता आडवल्याने या लोकांना पकडण्यासाठी पोलिसांची प्रचंड तारांबळ उडाली होती. समुद्रात देखिल पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

जेएनपीटी वसविण्यासाठी हनुमान कोळीवाडा हे गाव उठविण्यात आले होते. मात्र या गावाचे शासकीय मानकांनुसार पुनर्वसन करण्यात आले नाही.१७.५ हेक्टर जागेवर पुनर्वसन करणे गरजेचे असताना फक्त साडेचार एकर जमिनीवर ते सुध्दा वाळवीच्या जागेवर पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यामुळे संपुर्ण गावातील घरांना वाळवीने पोखरले आहे. त्यामुळे शासनाच्या नियमानुसार १७ हेक्टर जागेवर आणि सोयी सुविधा असलेल्या जागेवर आमच्या गावाचे पुन्हा पुनर्वसन करावे अशी मागणी सातत्याने हे ग्रामस्थ करत आहेत. यासाठी केंद्र सरकार पासून राज्यसरकारचे उंबरठे झिजवले मात्र त्याना न्याय मिळाला नाही. आत्ता या ग्रामस्थांनी आरपारची लढाई लढण्याचा निर्णय घेतला असून शुक्रवार दि२६ पासून समुद्रात जेएनपीटी बंदराकडे येणारी जहाजे आडवून कोंडी करण्यात येणार होती. त्यानुसार सकाळपासूनच हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेवून जेएनपीटीची जहाजे अडविण्यासाठी निघ-ाले असताना वाटेतच त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांच्या या भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये कमालीचा संताप व्यक्त करण्यात येत असून जेएनपीटी प्रशासनाच्या अडेलतट्टू भूमिकेबद्दल निषेध व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान काही ग्रामस्थांनी समुद्रात आपल्या होड्या आडव्या टाकून जेएनपीटीकडे येणारी जहाजे अडविण्याचा प्रयत्न केला.परंतु बंदराकडे येणारी मालवाहू जहाज अडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ग्रामस्थांची पोलिसांकडून धरपकड करण्यात आली. आणि आंदोलन कर्त्या ग्रामस्थांना एका सुरक्षित ठिकाणी ठेवून पोलीसांनी संध्याकाळी सुटक केली.

संक्षिप्त...

पनवेल परिसरातील तीन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यु व दोन जखमी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल परिसरात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यु व दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

खारघर जवळील हिरानंदानी पूलाशेजारी कमलेश प्रसाद सिंग (वय-४१) यांनी काही कारणासाठी गाडी उभी ठेवली असता मुंबईकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव वेगातील ट्रकवरील चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने पूल-ावरील संरक्षण भिंतीवरून खाली उभ्या असलेल्या वॅगेनार कारवर जोदरापणे जाऊन आदळला यात सिंग हे गंभीररित्या जखमी होऊन मृत्यु पावले आहेत. तर याप्रकरणी ट्रक चालक संजय खराडे याला खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दुसऱ्या घटनेत तालुक्यातील पेंधर गाव येथून मोटारसायकलीवरून सुरेश कोळी (वय-५९) व धर्मा पाटील (वय५८) हे मोरावे येथे जात असताना पाठीमागून आलेल्या टँकरने त्यांच्या मोटारसायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात धर्मा पाटील यांचा मृत्यु झाला आहे. तर सुरेश कोळी हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर तिसऱ्या घटनेत पनवेलजवळील गावदेवी मंदिराजवळ जेएनपिटी ते पळस्पे रोडवर पादचारी मधुकर विखारे (वय-७५) यांना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात ते जखमी झाले आहेत. या अपघातानंतर वाहनचालक पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पसार वाहनचालकाचा शोध सुरू आहे.

बंगाल, केरळसह ५ राज्यात निवडणुका जाहीर; पश्चिम बंगालमध्ये तब्बल ८ टप्प्यात होणार मतदान

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

आज झालेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाकडून देशातील पाच राज्यांच्या निवडणुकींच्या तारखा घोषित करण्यात आल्या आहेत. यामध्ये पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुडुचेरी केंद्र शासित प्रदेशाचा समावेश आहे. या राज्यांमधील निवडणुका पाहता निवडणूक आयोगाच्या पथकांनीही नुकतीच या राज्यांना भेटी दिल्या आहेत.

केरळमध्ये एकाच टप्प्यात होणार विधानसभेची निवडणूक, ६ एप्रिल रोजी मतदान २ मे रोजी निकाल. आसाममध्ये तीन टप्प्यात मदतदान होणार, २७ मार्च, तामिळनाडूमध्ये पण एकाच टप्प्यात निवडणूक, केरळ प्रमाणेच मतदान सहा एप्रिलला तर २ मे ला निकाल. केरळ आणि तामिळनाडू एकाच दिवशी होणार. पश्चिम बंगलामध्ये आठ टप्प्यात निवडणूक होणार, ७ मार्चला पहिल्या टप्प्यातील मतदान.

तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरीच्या निवडणुका एकाच टप्प्यात सहा एप्रिल रोजी, तर आसामची निवडणूक तीन टप्प्यात होणार. पश्चिम बंगालमध्ये आठ टप्प्यात विधानसभा निवडणूक पहिला टप्पा - २७ मार्च मतदान, दुसरा टप्पा - १ एप्रिल मतदान, तिसरा टप्पा - ६ एप्रिल मतदान, चौथा टप्पा - १० एप्रिल मतदान, पाचवा टप्पा - १७ एप्रिल मतदान

ऑनलाईन बॅकींग झाले खरे परंतु धोकादायकच

दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार

पनवेल : झटपट बॅकींग व्यवहार करा व आपला किमती वेळ वाचवा ही बीरूदावली हळुहळु धोकादायक होऊ लागल्याचे जनमानसात बोलले जात आहे.

आता आपले बॅकेतील व्यवहार पारदर्शक करण्याकरीता विविध बॅकेतील व्यवहार हे शासनाच्या नियमानुसार नियमावलीत राहुनच करावे लागतात. (कॅशेलेस)या गोंडस नावाखाली बॅकेचे प्रत्येक खाते नविन असो वा जुने संबंधित व्यक्तीने आपापल्या बॅक खात्याशी स्वतःचे आधार कार्ड नंबर, मोबाईल नंबर लींक करणे क्रमप्राप्त झाले आहे. बँकेतून आर.टी.जी.एस, एन.ई.एफ.टी. करण्या करीता बॅक डीटेल्स सह ईमेल आदी विविध सोपस्कार करावे लागतात. त्यामुळे सर्व सामान्य नागरीकांची पुर्ण बॅक खात्याची अकाऊंन्ट डीटेल्स बॅकेकडे नोंद झालेली असतात. तर रेशन कार्डलाही आपले आधार कार्ड संबधीत व्यक्तीचा मोबाईल लिंक केल्याशिवाय रेशनवर धान्य सुविधा उपलब्ध होत नाही. त्यातच विविध फायनान्स कंपन्या देखील कर्ज घेणारी व्यक्तीचे पॅन कार्ड, आधार कार्ड, लींक असलेला मोबाईल नंबर घेत असतात. नविन मोबाईल घेतेवेळी देखील आधार क्रमप्राप्त केले आहे. अशा आता विविध क्षेत्रात वरील सर्व सामान्य नागरीकांची पुर्ण माहीती (डेटा) विविध ठिकाणी विखुरला गेलेला असतो. याचाच फायदा काही फायनान्स कंपन्या ह्या ग्राहकाचा हा डेटा ठराविक रकमेला हस्तांतरण करीत असल्याची चर्चा आहे? याचाच फायदा घेवून हॅकर्स अनेकांना विविध ठिकाणी फोन करून अथवा विविध प्रकारच्या लिंक संबंधित ग्राहकाला पाठवून त्यांची बँक अकाऊंट खाली करण्याचे प्रकार सर्रास, विविध ठिकाणी वाढल्याची प्रकरणे रोज घडत असतात. इथुनच नंतर सर्व सामान्य नागरीकांची ऑनलाईन लुट करण्याची सुरुवात होते. मग संबधीत व्यक्तीच्या मोबाईल वर विविध शक्कल लढवुन हे हॅकर्स लींक पाठवुन अथवा आपणास लॉटरी लागली आहे, किंवा खोटे बॅकेचे नाव सांगुन आपले एटीएम बंद होणार आहे, अथवा एटीएम मध्ये क्लोनिंग कार्ड चा उपयोग करून, ऑनलाईन फसवणुकीच्या अनेक तक्रारी विविध पोलीस ठाण्यात दाखल होत असतात. पुर्वी ऑनलाईन पेमेन्ट सुविधा फक्त संबधीत बॅकेतुनच होत असत. त्या सुविधा सेफ असत, असे नागरिकांत बोलले जात आहे. परंतु (कॅशलेस) टेक्नॉलजी जेव्हा पासुन सुरू झाली तेव्हापासुन पैसे देवाणघेवाण सोपे झाले खरे परंतु अनेक गोरगरीबांच्या बॅक अकाऊंन्ट वर हॅकर्स ने डाका टाकण्याचे प्रकार दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढीस लागले ..../२

आंतरजिल्हा घरफोडी करणाऱ्या दोन अट्टल चोरटयांना अटक

दै.रायगड नगरी । अलिबाग

माणगांव पोलीस ठाणे खकाँ.गुन्हा रजि.नंबर २२/२०२१, भा.द.वि.कलम ४५७, ३८०,३४. प्रमाणे हा गुन्हा दिनांक ०२/०२/२०२१ रोजी दाखल आहे. सदरचा गुन्हा उघडकीस आणणे करीतामा. पोलीस अधिक्षक अशोक दुधे, मा. अपर पोलीस अधिक्षक सचीन गुंजाळ यांचे मार्गदर्शना नुसार दयानंद गावडे, पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शाखा, रायगड यांच्या नेतृत्वा खाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखे कडील सपोनि./एस.एस. नावले व पोलीस अंमलदार तसेच सपोनि./ एस.ए.पोमण व पोलीस अंमलदार यांचे पथक तयार करण्यात आलेआहे.

नमूद पथकांनी अज्ञात आरोपीत यांचा गुप्त बातमीदारा मार्फत माहीती काढुन सचोटिने प्रयत्न करून नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी नामे १) शाकीर हैदर शेख, वय-४२ वर्षे, रा.रूम नं.४४, बाबासाहेब आंबेडकरपाडा, न्यु-एअर, ज्युबलीपार्क, श्रीलंका, मुंब्रा, जि.ठाणे व २)अकबर नुरमहमद पटेल, वय-४२ वर्षे, रा.हरकुलबुद्रुक, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग

यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांनी खालील नमूद गुन्हे केल्याचे कबूल केले असून त्यांना अटक करून त्यांचे कडुन अनेके गुन्हे उघडकीस आणले आहेत. ..../२

आदेश बांदेकर यांची माथेरान पर्यटन राजदूत म्हणून निवड

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान गिरीस्थान नगर पालिकेने दि.२६ झालेल्या विशेष सर्व साधारण सभेत आदेश बांदेकर याची माथेरान पर्यटन वाढी साठी माथेरानचे पर्यटन राजदूत (ब्रॅण्ड ऐंबेसेडर) म्हणून निवड करण्यात आली.

सुप्रसिद्ध दिग्दर्शक, झी मराठीच्या होम मिनिस्टर या कार्यक्रमातुन संपूर्ण महाराष्ट्राचे, देशाचे लाडके भावोजी म्हणून नावलौकिक मिळविलेले, शिव-सेना सचिव, सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा माजी संपर्क प्रमुख आदेश बांदेकर याची माथेरान पर्यटन राजदूत म्हणून निवड केल्याने येथील पर्यटन वाढीस मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या हस्ते आदेश बांदेकर यांना माथेरान पर्यटन राजदूत निवडीचे पत्र देऊन माथेरान नगरपरिषदेच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ आणि मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला,

यावेळी उपाध्यक्ष आकाश चौधरी, गटनेते, तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत, मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव, नगर सेवक राजेंद्र शिंदे, संदीप कदम,चंद्रकांत जाधव, नगरसेविका कीर्ती मोरे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी, रत्नदीप प्रधान,कार्यालय अधीक्षक रणजित कांबळे, स्वागत बिरंबोळे, अंकुश इचके, राजेश रांजणे, प्रवीण सुर्वे आदी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

सर्व समान्यांवर महागाईची टांगती तलवार ; घरेलू गॅसच्या किंमतीत वाढ, दरवाढीमुळे एकच संताप

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

पेट्रोल-डिझेल इंधनाच्या आकाशाला भिडलेल्या किंमती आणि बाजारात प्रचंड वाढलेल्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडत जगणे अवघड केलेले असतानाच आता मोदी सरकारने गोरगरिबांना आणखी एक झटका देत सरकारी तेल कंपन्यांनी घरगुती घरेलू गॅस सिलेंडरच्या किंमती पुन्हा वाढवल्या आहेत. मागील तीन महिन्यात दरवाढीचा सुरू असलेला खेळखंडोबा आता तब्बल दोनशे रूपयांनी सिलेंडर महागला आहे. पुन्हा २५ रूपये वाढवल्यानंतर विना अनुदानित १४.२ किलोग्रॅमच्या एलपीजी सिलेंडरची किंमत ७६९ रुपयांनी वाढून

७९४९ रुपये झाली असल्यानं मोजवं लागत घरपोच डिलिव्हरी करण्यात गॅस खरेदीवर अधिक पैसे मोजावे लागत असल्यानं घरातील महिलांचा एकच संताप व्यक्त करण्यात येत आहे .

बाजारात पुन्हा महागाईचा भडका आता सर्वच वस्तूंच्या किंमतीत दुप्पट भाव वाढले त्यामुळे आता खाद्यपदार्थांच्या व कडधान्य किंमती गगनाला भिडल्याने सर्वत्र ग्राहक वर्गात एकच संतापाची लाट पसरली तर गरिबांवर पुन्हा महागाईची व चढ्या भावाची टांगती तलवार असल्याने केंद्र सरकाच्या धोरणांचा सर्वत्र एकच संताप पहावयास मिळत आहे.

कोरोनाचा कहर सर्वसामान्यांच्या अखेर जीवावर वेतला कोरोना काळात गरिबांना घरपोच शासनासह विविध सामाजिक संस्था यांच्या सहकार्यातून यांनी किराणा समान जीवनावश्यक वस्तू पुरविल्या मात्र त्याच जीवणाकश्यक वस्तूंचे भाव आता गगनाला भिडले त्यामुळे बाजारात किराणा सामान खरेदीसाठी येत असलेल्या ग्राहक वर्गात ..../२

पाली खोपोली महामार्गावर ओव्हरलोड वाहतूक थांबेना ; परिवहन विभागाच्या कानाडोळा

सावित्री नदी दुर्घटना घडण्याची शक्यता?



दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

पाली खोपोली राष्ट्रीय महामार्गाचे गेली चार वर्षापासून काम चालू आहे. मात्र ३५ किमीचा हा रस्त्यासाठी अनेक कंत्राटदाराने लाभले. बेग कंट्रक्शन त्यांचेकडून कंत्राटी काम रद्द करून वराह इन्फ्रा लि.या कंपनीला देण्यात आले.मात्र या कंपनीने काही महिन्यातच वेगाने काम सुरू केले आहे.येणाऱ्या जून महिन्यापर्यंत रस्त्याचे १०० टक्के काम पूर्ण करू वराह इन्फ्रा लि. व एमएसआरडीसी अभियंता निफाडे यांनी आश्र्वासित केले आहे. या मार्गावरी नवीन पुलांचे काम ही सुरु आहेत.

जुना आंबा नदीवरील पाली, जांभुळपाडा दोन्ही पुल कमकुवत झाले आहेत. एखादा अवजड वाहन या पुलावरुन गेले कि मोठ्या प्रमाणात हादरा बसत आहे. त्यामुळे दोन्ही पुल कमजोर झाले आहेत या वारंवार खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांना ओव्हरलोड वाहतूक बंद करण्यास जिल्हा अधिकारी यांनी आदेश केले असताना ही या मार्गावर दुपारच्यावेळेस तसेच रात्रीच्यावेळेस सरासपणे अवजड वाहन धावत आहे. याकडे संबंधित खातेच्या अधिकाऱ्यांकडून का कानाडोळा केला जातो ?

वाहतुकीचे नियम सर्वसामान्य नागरिकांना दाखविणारे ..../२

खासगीकरणाचे वारे

व्यवसाय करणे हे सरकारचे काम नाही, असा क्रांतिकारी विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे मांडल्याने पोथीनिष्ठ डाव्यांपासून ते स्वदेशीवाल्या उजव्यांपर्यंत सगळ्यांचे होश उडाले असतील. सार्वजनिक क्षेत्रातील जवळपास सर्व कंपन्या; तसेच महामंडळांच्या खासगीकरणाचे सूतोवाच करताना, पंतप्रधानांनी तोट्यातील महामंडळांचा आर्थिक भार करदात्यांच्या पैशातून उचलण्यापेक्षा लोककल्याणाची कामे करता येतील, असे स्पष्ट केले. विद्यमान सरकारची खासगीकरणाची ही धोरणे स्पष्ट करताना, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही पंतप्रधानांची भूमिका विस्ताराने पुढे नेत, खासगी बँकांना सरकारी व्यवहार करण्यास परवानगी देण्याचे; तसेच दोन प्रमुख विमा कंपन्यांचेही खासगीकरण केले जाणार असल्याचे त्याच दिवशी जाहीर करणे, हा खचितच योगायोग नाही. बँकांच्या राष्ट्रीयीकरणास अर्धशतकाहून अधिक काळ लोटला असताना, मोदी सरकारने धोरणात्मकदृष्ट्या घड्याळाचे काटे उलटे फिरविण्यास सुरुवात केली आहे, हे त्यातील व्यवच्छेदक लक्षण. हे योग्य की अयोग्य, यावर मतमतांतरे होऊ शकतील. तशी ती १९६९मध्येही झालीच होती; पण विद्यमान काळाची परिमाणे वेगळी आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील अनेक आजारी उद्योग ही गेली काही वर्षे सरकारची डोकेदुखी बनून गेली आहेत. अशा उद्योगांचे लोढणे तसेच ठेवून आर्थिक प्रगती साधणे शक्य नाही, हे खरेच. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या काळातच खासगीकरणास सुरुवात झाली होती. त्यांनाही तेव्हा विरोधाला तोंड द्यावे लागले. सध्या खासगीकरणाचा तारस्वरात पुरस्कार करणाऱ्या भाजपनेच तेव्हा देश विकायला काढला गेल्याची मल्लिनाथी केली होती; मात्र त्या सरकारने समाजवादाची कास न सोडता उदारीकरणाला चालना दिली. मोदी मात्र मोठ्या धाडसाने त्यापुढे जाऊ इच्छितात. व्यवसाय करणे हे सरकारचे काम नाही, हे त्यांचे म्हणणे शंभर टक्के सत्य आहे. जे उद्योग सरकारचे नाही, ते त्यांनी करूच नये; पण सगळ्यांच क्षेत्रात खासगीकरणाला वाट मोकळी करून देणे, हा काही त्यावरचा जालीम उपाय असू शकत नाही. अन्न, वस्त्र, पाणी, निवारा, शिक्षण व आरोग्य या पायाभूत क्षेत्रांत खासगीकरणाला वाव करून देणे, म्हणजे एकापरीने सामान्य जनतेला असलेले संरक्षण काढून घेण्यासारखेच आहे. आजही देशातील २३ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठत आहे. खासगीकरणात या कोट्यवधी नागरिकांना वाऱ्यावर सोडल्यासारखे होईल. नफा हीच खासगी उद्योगांची मूलभूत प्रेरणा असते. मानवी मूल्यांना तेथे फारशी किंमत नसते. या पार्श्वभूमीवर पन्नास वर्षांपूर्वीच्या बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचाही आठव करायला हवा. तेव्हा खेडोपाड्यात बँका गेल्या. कृषिक्षेत्राला अर्थपुरवठा झाला. बँकांना सरकारी उद्दिष्टे दिली गेली, म्हणूनच देशात हरित क्रांती यशस्वी होऊ शकली. एसटीचे सरकारीकरण केले नसते, तर गावागावांत ही 'लाल परी' पोहोचली असती का? जगभर नावलौकिक असलेल्या आयआयटी वा आयआयएमसारख्या संस्था सरकारनेच उभारल्या आहेत. अशा दर्जेदार संस्था खासगी उद्योगांना या प्रमाणात उभारता आलेल्या नाहीत, हे कसे विसरता येईल? उदारीकरणात जागतिक बाजारपेठेशी मिळतीजुळती धोरणे हवीत, यात दुमत नाही; परंतु भारतासारख्या आजही विकसनशील असणाऱ्या देशात गोरगरिबांच्या जीवनव्यवहाराची जबाबदारी सरकारला झटकता येणार नाही. भारतीय घटनेत समता, बंधुता व स्वातंत्र्याचे तत्त्व आहे. वंचितांना संधीची समानता देण्याचेही दिशादर्शन आहे. सर्वच क्षेत्रातील खासगीकरणानंतर या तत्त्वांना हरताळ फासला जाण्याची भीती आहे. खासगी संस्थांमुळे शिक्षण व आरोग्य कसे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे आणि सरकारी व्यवस्थेमुळे ते शिक्षण व आरोग्य गरिबांना कसे शक्य होते, हे वेगळे सांगायची गरज नाही. प्रत्येक व्यवस्थेचे जसे काही फायदे-तोटे असतात, तसे खासगीकरणाचेही आहेत; पण लोककल्याणकारी शासन प्रणालीत सामाजिक बांधिलकी अनुस्यूत असते. पश्चिमेकडे डोळे लावून धोरणे आखताना, आपल्या समाजवास्तवाचा विचार केंद्रस्थानी हवा. एअर इंडियासारखे पांढरे हत्ती पोसण्यापेक्षा विकून टाकले, तर कोणाची ना नसेल; पण पाणी, वीज, सार्वजनिक वाहतूक, शेती अशा सामान्य नागरिकांच्या अस्तित्वाशी निगडीत पायाभूत सेवांचे खासगीकरण झाले, तर सामान्यांना वाली राहणार नाही. अमेरिकेतील टेक्सास राज्यात गर्भश्रीमंतही कसे घोटभर पाणी व दोन वेळच्या जेवणाला मोताद झाले, याचे उदाहरण खासगीकरणाचे अंधानुकरण करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे ठरावे. केवळ खासगी वीज वितरण कंपनीमुळे तेथे उडालेला हाहाकार जगासाठी धडा ठरावा. अर्थव्यवस्था तगवणारी व अर्थातच सामान्यांनाही जगवणारी वेगवेगळी क्षेत्रे खासगीकरणाने ठरावीक लोकांच्या हातात गेल्यास, सरकार नावाच्या व्यवस्थेच्या मर्यादाही पुढे येतील. अशा बलाढ्यांवर नियंत्रण ठेवणेही कठीण होऊन बसेल. म्हणूनच ठरावीक लोकांच्या हाती व्यवस्थांचे केंद्रीकरण होणे, हे सार्वभौम प्रजासत्ताकाला आव्हान ठरू शकेल. सरकारच्या खासगीकरणाच्या मोहिमेत हे होता कामा नये.

सिडकोतर्फे साडेबारा टक्के भूखंडांवरील निवासी नळजोडणी धारकांसाठी अभय योजना ; विलंब शुल्क माफीसह वाणिज्यिक ऐवजी निवासी दर लागू

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

सिडको महामंडळातर्फे पनवेल महानगरपालिका क्षेत्र आणि सिडको अधिकारक्षेत्रातील १२.५% भूखंडांवरील भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या गृहनिर्माण संस्था/इमारतींसाठी अभय योजना जाहीर करण्यात आली असून या योजनेस राज्य शासनाचीही मंजुरी मिळाली आहे. अभय योजनेनुसार नळ जोडणीधारकांचे विलंब शुल्क माफ करण्यासह त्यांना भविष्यात वाणिज्यिक ऐवजी निवासी दरांनुसार पाणी देयके आकारण्यात येणार आहेत. सदर योजना ही ०१ मार्च २०२१ ते २८ फेब्रुवारी २०२२ या एक वर्षाच्या कालावधीकरिता ग्राह्य असणार आहे.

अभय योजनेकरिता अर्ज करणाऱ्या गृहनिर्माण संस्था/इमारती यांनी आठ (०८) महिन्यांच्या कालावधीत अधिकतम चार (०४) हफ्त्यांत पूर्ण पायाभूत सुविधा शुल्क (आयडीसी) आणि विलंब शुल्क (डीपीसी) वगळता पाणी देयकापोटी भरावयाचे शुल्क सिडकोकडे भरावे. थकीत शुल्क भरल्यांतर त्यांना संबंधित प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) प्राप्त करण्याकरिता सिडकोकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. अर्जदार गृहनिर्माण संस्था/इमारत यांनी (कमाल) चार महिन्यांच्या कालावधीत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता संबंधित प्राधिकरणाशी संपर्क साधावा. अर्जदारांनी पाणी पुरवठ्यासाठी आकारण्यात येणाऱ्या वाणिज्यिक दरांचे निवासी दरांमध्ये रूपांतर करण्याच्या विनंतीसह पायाभूत सुविधा शुल्क, पाणी देयक शुल्क (विलंब शुल्काव्यतिरिक्त) आणि संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त केलेल्या भोगवटा प्रमाणपत्र यांच्या प्रती सिडकोच्या पाणी पुरवठा विभागाला सादर कराव्यात.

तद्नंतर सिडकोच्या पाणी पुरवठा विभागाकडून विलंब शुल्क माफीसह नवीन पाणी देयक पाठविण्यात येईल. तसेच भविष्यातील पाणी देयके ही सुधारित निवासी दरांनुसार पाठविण्यात येतील.

अभय योजना जाहीर झाल्याच्या तारखेपासून एक (०१) वर्षाच्या आत गृहनिर्माण संस्था/विकासक/बांधकामधारक भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यास असमर्थ ठरल्यास त्यांना अभय योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच विलंब शुल्कामध्ये माफी न देता त्यांच्याकडून वाणिज्यिक दरांनुसारच पाणी देयके आकारण्यात येतील.

तरी सिडकोच्या नळजोडणी धारक असणाऱ्या जास्तीत जास्त गृहनिर्माण संस्था/इमारती यांनी सदर अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. अभय योजनेविषयीच्या अधिक माहितीकरिता कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), सिडको लि., ४ था मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे किंवा ee.ws1cidcoindia.com या संकेतस्थळावर किंवा ०२२-६७१२१०१२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

८ वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या मामास ५ वर्ष सश्रम कारावास

दै.रायगड नगरी । अलिबाग

मा. विशेष न्यायाधीश श्रीमती शईदा शेख सो. यांनी आरोपी आकाश सिद्धार्थ मोरे, वय-१९ वर्षे रा. पिरडोंगरी ता. पेण जि. रायगड यास अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याच्या आरोपाखाली भा.द.वि. कलम ३५४ व प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स -उढ कलम ७, ८, ९एम, १०, ११, १२ या कलमांखाली ५ वर्षे सश्रम कारावासाची व ५०००/-रु. दंडाची शिक्षा ठोठावली व दंड न भरल्यास आरोपीला १ महिन्याची शिक्षा भोगण्याचा आदेश दिला आहे.

सदर प्रकरणातील अल्पवयीन पिडीत मुलीचा आरोपी हा मानलेला मामा आहे.आरोपी याने घटनेच्या दिवशी फिर्यादीच्या घरी गेला त्यावेळेस पाऊस आल्याने फिर्यादी अंगणात वाळलेले कपडे आणण्याकरिता अंगणात गेली त्याच वेळेस वीज गेल्याचा फायदा घेऊन पिडीत मुलीला आरोपीने दरवाज्याच्या पाठी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

सदर बाब पिडीतेने आई घरात आल्यावर सांगितली म्हणून सदर गुण्याची फिर्यादपिडीतेच्या आईने पेण पो. ठाणे गु.र.नं. १११/२०२० खाली भा.द.वि. कलम ३५४ व प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स -उढ कलम ७, ८, ९एम, १०, ११, १२ अन्वये दाखल केली होती. त. अंमलदार यांनी सदर खटल्याचा तपास पूर्ण करून दोषारोपपत्र मा. विशेष न्यायालयात दाखल केले.

सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष न्यायाधीश श्रीमती एस. एस. शेख मॅडम यांचे न्यायालयात झाली. या केसमध्ये सरकार पक्षातर्फे विशेष शासकीय अभियोक्ता ॲड अश्विनी बांदिवडेकर-पाटील यांनी एकुण ५ साक्षीदार तपासले. सदर गुन्ह्यातील फिर्यादी व पिडीत मुलगी यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली तसेच पैरवी अधिकारी श्रीमती मोनिका मुळे, महिला पोलीस शिपाई, आणि पेण पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार श्री. गुजराथी यांचे सहकार्य मोलाचे ठरले. त. अंमलदार श्री. एस. एन. पिंपळे यांचा तपास महत्वपूर्ण ठरला.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांनी मा. न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून मा. विशेष न्यायालयाने दि.२६/०२/२०२१ रोजी आरोपी आकाश सिद्धार्थ मोरे वय-१९ वर्षे याला अलिबाग येथील विशेष न्यायालयाने भा.द. वि. कलम ३५४ व प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स -उढ कलम ७, ८, ९एम, १०, ११, १२ अन्वये या कलमाखाली ५ वर्षे सश्रम कारावास व ५०००/- रु. दंडाची शिक्षा ठोठावली. सदरच्या खटल्यामध्ये पेण तालुक्यातील तसेच पेण परिसरातील लोकांचे लक्ष लागून राहिलेले होते.

पेणमध्ये दंगा काबू योजने अंतर्गत पोलिस दलाची रंगीत तालीम

दै.रायगड नगरी । पेण

पेण पोलिस ठाणे हद्दीत दंगा काबू योजने अंतर्गत कायदा व सुरक्षा अबाधित राखण्यासाठी आणि येणारे सण उत्सव आदी काळात दंगा किंवा काही अनुचित प्रकार घडून नये या अनुषंगाने पोलीस दलाच्या पथका कडून रंगीत तालीम घेण्यात आली.

यावेळी पेण शहरातील रहदारिच्या एस.स्टी.स्टँड प रिसरात उपविभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व स्थानिकांच्या मदतीने दंगा काबू पथकाची रंगीत तालीम घेण्यात आली. या प्रसंगी पोलिस निरीक्षक बाळकृष्ण जाधव, सहा.पो.निरीक्षक पिंपळे, महिला पोलीस उपनिरिक्षक शिंदे, ठाणे अमलदार किशोर घरत, मारुती मांढरे, तडवी, मेहतर, कांबळे, भोनकर, दोर, बेलेकर, महिला पोलिस कांबळे, म्हात्रे आदि तीस जनांच्या पोलीस पथकाकडून दंगा काबू योजने अंतर्गत रंगीत तालीम घेण्यात आली.

उरणमध्ये नवपरिवर्तन संस्था आणि उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशनकडून जनजागृती

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यामध्ये कोरोना बाधितांची संख्या वाढुनये, यासाठी नवपरिवर्तन संस्था आणि उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी नागरिकांना मास्क आणि सुचनापत्रके वाटण्यात आली. कोरोना रुग्ण संख्येत होत असणारी वाढ पाहता पुन्हा लॉकडाऊन नको यासाठी ही जनजागृती मोहीम घेण्यात आली होती.

राज्यभरामध्ये कोरोना बाधितांची आकडेवारी वाढत असल्याने, पुन्हा लॉकडावूनच संकट उभे राहिले आहे. पुन्हा लॉकडाऊन होऊनये यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे. उरण तालुक्यातील उरण मेडिकल वेल्फेअर असोसिएशन ही डॉक्टर संघटना आणि सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असणाऱ्या नवपरिवर्तन संस्था यांनी पुढाकार घेत जनजागृती केली आहे. शुक्रवारी सकाळी १० वाजता या संघटनांनी शहराच्या माध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या पालवी हॉस्पिटल चौकामध्ये नागरिकांना कोरोना संदर्भात घ्यायची खबरदारी असणारी पत्रके आणि मास्क वाटप करून, जनजागृती करण्यात आली. यावेळी उरणच्या नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत नियमांचे पालन केले.

मा.उपमहापौर विक्रांत पाटील जातीने उपस्थित राहून करून घेतले मॅन होलचे काम

दै.रायगड नगरी । पनवेल

मुख्य रस्त्यावर मॅनहोल कव्हर तुटल्यामुळे वाहतुकीस खोळंबा होत असल्याचे पनवेल महानगरपालिकेचे मा. उपमहापौर विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी जातीने रात्री उभे राहून मॅन होलचे काम पूर्ण करून घेतले. स्वामी नित्यानंद मार्गावरील मॅन होल कव्हर तुटल्यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला होता. संभाव्य धोखा लक्षात घेता नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरित मॅन होल कव्हर करून दोन्ही बाजूला बॅरिकेट्स लावून घेतले.तात्काळ पालिका अधिकाऱ्यांशी फोन वर संपर्क साधला, त्वरीत नवीन मॅन होल कव्हर मागवता येणार नाही आणि काम दुसऱ्या दिवशी होईल असे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले. पण नगरसेवक विक्रांत पाटील यांनी अधिकाऱ्यांना विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले आणि त्वरित मॅन होल कव्हर मागवून घेतले व प्रत्यक्ष उभे राह्यन कव्हर लावून घेतले.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्परतेने मॅन होल कव्हर लावून घेतल्या बद्दल प्रभागातील नागरिक समाधान व्यक्त केले आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

पृष्ठ क्र.१ वरुन...

ऑनलाईन बॅकींग झाले खरे परंतु धोकादायकच

आहेत. या काही जेष्ठ नागरीकांचीही बॅक खाती मोठ्या प्रमाणात टार्गेट केल्याची अनेक उदाहरणे समोर येत आहे.

आज रोजी दिवसा आड शेकडो फेक लिंक नागरीकांच्या वॉटसप, फेसबुक, ट्विटर, तसेच ईमेल वर धडकत असतात अनेक वेळा तर आपला मोबाईल नंबर तीराहीताकडे कसा काय गेला व आपल्या पुर्ण नावासहीत ती व्यक्ती आपल्याला कशी काय ओळखते हे पाहून काही व्यक्ती आश्चर्यचकीत होत असतात. व इथेच त्यांची फसवणूक होण्यास सुरूवात होते. काही शासकिय निमशासकीय अथवा एंजन्ट करवी कामे करण्याकरीता आपण आधारकार्ड, पॅन कार्ड, ई मेल अशी विविध स्वरुपाची माहीती फोटो सहीत तर कधी छायांकित प्रत (झेरॉक्स) कामकाजाच्या स्वरूपात सर्रास गाफील राहुन देत असतो. याचाही कधी दुरूपयोग होईल हेही ऑनलाईन (कॅशलेश) युगात सांगणे कठीण आहे. अनेक वेळा अशा ही घटना समोर आल्या आहेत की आपण कोणतेही रितसर कर्ज, फायनान्स कंपनीकडुन घेतले नसतानाही आपणास आपले कर्जाचे हप्ते थकले आहेत असे फोन येतात असे ही किस्से काही ठिकाणी घडल्याची चर्चा आहे?

अनेक वेळा आपण हॉटेल्स, मॉल अथवा पिकनीक निमीत्ताने विविध ठिकाणी खरेदी करीता जात असतो तेव्हा डेबीट कार्ड, एटीएम, किंवा क्रेडिट कार्ड चा संबधीताच्या विविध कंपन्यांच्या मशीनवर सदर कार्ड स्वाईप करताना पीन नंबर टाकतो त्या वेळी वरील ठिकाणी सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविलेले असतात. परंतु ग्राहक घाईत असल्याने हवी तीतकी व्यवहाराची काळजी घेतली जात नाही. नंतर काही दिवसांनी अचानक बॅक खाते खाली होते तेव्हा माञ बोलले जाते रोख व्यवहारच बरा होता कॅश लेस नको रे बाबा...अशी म्हणण्याची वेळ आता समीप आल्याची प्रकर्षाने जाणवीते एवढे माञ नक्की!

दोन अट्टल चोरटयांना अटक

अटक आरोपी यांच्याकडून रायगड जिल्हयातील उघडकीस आलेल्या गुन्हया मधील चोरीस गेलेले ३१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ३ मोबाईल असा एकुण १,१३,०००/-रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.सदरचे आरोपीत हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचे विरूध्द अनेक पोलीस ठाणे कडे अशाप्रकारे घरफोडी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सर्व समान्यांवर महागाईची टांगती तलवार

मात्र एकच संताप व्यक्त केला जात असून खाद्यतेल जीवनावश्यक वस्तू किराणा दरात वाढ झाल्याने आता

महागाईने सर्वांचेच कंबरडे मोडले कोरोना काळात काही व्यवसाईकांनी चढा भावाने समान विक्री केले त्यात आता पुन्हा गॅस ची दरवाढ झाली त्यामुळे अधिकच भरमसाठ किंमती वाढल्याने किचनमध्ये महिलांना काही सुचेना घरात महिन्याला कमाईचा येणार एक रुपया आणि खर्च होणार दोन रुपये त्यामुळे हात मजुरी आणि मोल मजुरी करणाऱ्या मजुरांवर टांगती तलवार आल्याने भाव दरवाढीमुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येण्याचे संकेत मिळत आहेत घरात गॅस कनेक्शन त्यामुळे घासलेट मिळत तर किरकोळ सामानात घासलेटनी देखील काळ्याबाजारात शंभरी गाठत आहे नाही गॅस बाटला परवडत नाही वन विभागाच्या अटीशर्तीमुले जंगलातील सरफनाची लाकडे तोडण्यास बंदी किराणा सामानात कडधान्य ही महागले तेल डाळी मीठ मसाला साखर चाहा सह जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत तसेच हात मजूर काम करणारे गवंडी सुतार बेलदार विद्युत रोषणाई चे काम करणारे कामगार वर्ग यांच्या देखील सामानात भरमसाठ दरवाढ झाली असल्याने सर्वत्र एकच संताप व्यक्त केला जात आहे ,

पेट्रोल डिझेल शंभरीत त्याच बरोबर मागील दोन महिन्यांपासून १ डिसेंबर २०२० - गॅस सिलेंडर ५९४ रुपयांनी वाढून ६४४ रुपये झाला.१ जानेवारी २०२१- ५० रुपये वाढवल्याने ६४४ रुपयांचा सिलेंडर ६९४ रुपये झाला.४ फेब्रुवारी २०२१ - पुन्हा किंमत ६९४ रुपयांवरून वाढून ७१९ रुपये झाली.१५ फेब्रुवारी २०२१ - ७१९रुपयांवरून ७६९ रुपये झाला. आता २५ फेब्रुवारी २०२१ रोजी त्यात अधिक भर पडत २५रुपयांनी दर वाढवल्याने किंमत ७६९ रुपयांवरून ७९४ रुपये झाली आहे त्यातच वितरक घरपोच डिलिव्हरी देत असल्याने सदरच्या ग्राहकाला अधिक पैसे मोजावे लागल्याने सर्वत्र एकच संताप व्यक्त केला जात आहे .

केंद्र सरकारकडून सातत्याने होणाऱ्या भाव वाढ दरवाढीवर नियंत्रण कोणाचे कोणत्या मालाची किती किंमत याचे काही गणित नाही मनाला वाटेल तो भाव पटलं तर घ्या नाहीतर जा अशी वेळ आता ग्राहक वर्गावर येऊन ठेपली असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे सर्वच बाबतीत बाजारात समान खरेदीसाठी येणाऱ्या नागरिक ग्राहक वर्गाची पंचायत होत असतांना दिसत आहे.

वाहतूक थांबेना ; परिवहन विभागाच्या कानाडोळा

कायद्याचे हात, मात्र पाली खोपोली महामार्गावर होणाऱ्या कोळसा ,खडी ग्रेट, लोखंडी कोईल, लोखंडी पाईप यांचा बेकायदा ओव्हरलोड वाहतुक होत असताना. अशा अवजड वाहतुकिमुळे अपघात वाढले आहेत. यामुळे हा महामार्ग प्रवाशांसाठी असुरक्षित होत आहे. या सर्व प्रकाराकडे परिवहन विभागाचा मात्र कानाडोळा होत आहे कि जाणुनबुजुन दुर्लक्ष करत आहेत का? असा ही चर्चा सुरु आहे.

वाहतुकीचे नियममोडल्यानंतर सामान्य नागरिकांवर कारवाईचा बडगा उचलणारे उपप्रादेशिक परिवहन विभाग व वाहतूक पोलीस तसेच पोलीस विभागाला एमएसआरडीसीने पत्र देऊनही पाली खोपोली महामार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक राजरोसपणे चालू आहे.या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून संबंधित सरकारी यंत्रणा झोपेचे सोंग घेतल्याचे दिसून येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

कोरोना संसर्ग टाळण्यासाठी नियमांचे पालन करा : शारदा पोवार

दै.रायगड नगरी । कोर्लई

राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या आदेशानुसार प्रांताधिकारी शारदा पोवार यांनी मुरुड तहसील कार्यालयात अधिकारी वर्गाची नुकतीच एक बैठक घेऊन आढावा घेतला व योग्य त्या उपाययोजना बाबत सुचना देऊन कारवाई करण्याचे निर्देश दिले.

तहसीलदार गमन गावित, नायब तहसीलदार रवींद्र सानप, महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे,नगर परिषदेचे मुख्याधिकारी अमित पंडित, तालुका पंचायत समितीचे वानखेडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत जगताप, राजेंद्र चुनेकर, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.दिव्या सोनम, सर्व मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामसेवक यावेळी उपस्थित होते.

राज्यात, जिल्ह्यात कोरोना रोगाची दुसरी लाटेची शक्यता लक्षात घेऊन प्रांताधिकारी शारदा पोवार यांनी कोविड-१९ संदर्भात माझी जबाबदारी सार्वजनिक, गर्दीच्या ठिकाणी मास्क न वापरणारे, सोशल डिस्टंसचा वापर न करणा-या व्यक्तिवर कारवाई करण्याचे व पर्यटन स्थळे, बाजारपेठा, लग्न समारंभ, रिसॉर्टस् आदी.ठिकाणी तातडीने भेट देऊन नियमांचे काटेकोर पालन होते किंवा नाही ? याची पाहणी करण्याचे तसेच मास्क न वापरणा-या व्यक्तिवर कारवाई करण्यात निर्देश दिले व त्याबाबतचा दैनंदिन अहवाल सादर करण्यात यावा.असे सांगीतले.

राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनतेने मास्कचा वापर करून,सोशल डिस्टंस पाळून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

उंच पठारावर लागवड केलेल्या वृक्षांना पाण्याची सलाईन

दै.रायगड नगरी । उरण

उरण परीसरातील छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करणारी एकमेव संस्था छावा प्रतीष्ठान गेले सात वर्ष चिरनेर मधील पठारावर वृक्षारोपण करुन त्यांचे संवर्धन करत आहेत. आत्तापर्यंत या पठारावर त्यांनी २०० कडूनिंबाची झाडेही जगवीली आहेत. तर गेले दोन वर्ष त्यांनी करंज,वड, मोहाची झाड लावली आहेत. हि झाडे जगवीण्यासाठी छावा प्रतीष्ठानचे सदस्य खूप मेहनत घेत आसून प्रत्येक झाडाला जगवीण्यासाठी पाण्याची सलाईन लावली आहे.

या पठारावर नुसते चढतानाही दम लागते. परंतू छावा प्रतीष्ठानचे सदस्य पठाराच्या पायथ्यापासून ३०० मिटर उंचावर २० लिटरचे पाण्याचे ड्रम घेवून डोंगरावर चढतात. व ते पाणी प्रत्येक झाडाजवळ काठीच्या आधाराने लावलेल्या पाण्याच्या बॉटल मध्ये टाकतात. सध्या ही ९० झाडे जगवीण्यासाठी हे सदस्य तन मन धन

खर्ची घालीत आहेत. लॉकडाऊनच्या काळातही या सदस्यांनी झाडांचे संवर्धन केल आहे. त्यामुळे बोडका होत चाललेला हा डोंगर बहरु लागला आहे. या झाडांना जगवीण्यासाठी प्रामूख्याने छावा प्रतीष्ठानचे किरण म्हात्रे सर, उपाध्यक्ष सुशिल म्हात्रे, सदस्य संकेत म्हात्रे, खजीनदार सचिन केणी ,सचिव धिरज केणी,यांनी पुढाकार घेतला आहे. पिण्याच्या पाण्याची रिकामी बॉटल पाण्याने भरली जाते त्या बॉटलच्या बुंध्याला दाभणाने हवा आत जाण्यासाठी होल पाडला जातो किंवा कापतात.नंतर त्या बाटलीचा झाकण अशा प्रकारे सेट केला जातो की बॉटल उलटी केली की झाकणामधून थेंबथेंब पाणी पडेल. नंतर ती बॉटल झाडाच्या बुंध्याजवळ उभी केलेल्या काठीला आडकवतात. ह्या बॉटल मधील पाणी चार तास चालतो.त्यामूळे पाण्याची बचत होते व झाडालाही जास्त काळ पाणी पुरतो.

चिरनेर मध्ये उंचावर आसणारा पठार नावाने प्रसिद्ध आसा वनखात्याच्या मालकीचा डोंगर आहे.या पठाराची उंची एवढी आहे. कि तेथून संपूर्ण उरण दृष्टीक्षेपात येतो .या डोंगरावर गेले पाच वर्ष छावा प्रतीष्ठानचे मावळे गेले पाच वर्ष सिड बॉल व रोप लावून वृक्षसंवर्धन करत आहेत. त्याचा परीणाम आज या डोंगरावर दोनशेच्या वर कडूनींबाची झाडे जगली आहेत. यावर्षी छावा प्रतिष्ठानचे महीला, पुरूष, तरूण, तरुणी, लहान मुल, मुली आसे चाळीस मावळे मिळून नव्वद झाडांची लागवड केली. यात उन्हाळ्यातही दाट व थंड सावली देणार्या करंजाची चाळीस झाड. तर जास्त ऑक्सीजन देणारी पन्नास वडाची झाड लावण्यात आली. त्यामुळे येत्या काही वर्षात या पठाराची ओळखच बदलून वड निंब करंजाचे पठार आसे होवून जाईल. या वृक्षारोपणासाठी येवढ्या उंचावर सत्तर वर्षांच्या गंगाबाई भोईर व पाच वर्षांचे आक्षर कडू, ओम भोईर, सानवी कडू, आनन्या म्हात्रे ही सहभागी झाल्यामूळे त्यांचे कौतूक करण्यात आले. तर सारडे विकास मंचचे नागेद्र म्हात्रे, विठ्ठल ममताबादे उपस्थीत होते. छावा प्रतीष्ठानचे उपाध्यक्ष सुशिल म्हात्रे, सचिव धिरज केणी, कार्याध्यक्ष संतोष भोईर, खजिनदार सचिन केणी, सहसचिव रमेश कडू , आतीश पाटील, शरद चिर्लेकर,ओमकार म्हात्रे, शैलेश चिर्लेकर, आदिं छावा प्रतिष्ठानचे पदाधिकारी कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

पनवेल रेल्वे स्थानकात मराठी भाषा अभिमान गीत वाजवा : मनसे

दै.रायगड नगरी । पनवेल

राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पनवेल पदाधिकारी यांनी आज पनवेल रेल्वे स्थानकास अचानक रेल्वे अधिकारी यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.

यात मुख्य विषयाला हात घालत पनवेल रेल्वे स्थानकामध्ये मराठी भाषा दिनानिमीत्त मराठी भाषा गीत वाजवीण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण पनवेल शहरातर्फे महाराष्ट्र सैनिक अवधुत ठाकुर आणि विशाल चिञुक यांच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी रेल्वे स्थानक प्रबंधक नायर यांना लेखी पञ देण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत पनवेल विधानसभा सचिव प्रतिक वैद्य, पनवेल उपशहराध्यक्ष प्रकाश लाड विद्यार्थी सेना उपाध्यक्ष प्रतिक पाटील, माजी तालुका सचिव प्रथमेश सोमण, केदार सोमण आदी मनसैनिक उपस्थित होते.

कोप्रोली ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग निधी व आरोग्यवर्धक हळदीचे वाटप

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील कोप्रोली ग्रामपंचायतीच्या वतीने ५ टक्के दिव्यांग निधीतून येथील ३५ दिव्यागांना प्रत्येकी ८ हजार एवढ्या निधीचे वाटप व आरोग्यवर्धक हळदीचे वाटप कोप्रोली ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.अलका म्हात्रे यांच्या हस्ते व उपसरपंच निरज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कोरोना संसर्गाचे गांभीर्य लक्षात घेऊन, सुरक्षित अंतर राखून करण्यात आले.

यावेळी दिव्यागांना दिव्यांग निधी व आरोग्यवर्धक हळद कोप्रोली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील प्रत्येक घराघरात पोहोचविण्याचा आमचा मानस आहे.आत्ता पुन्हा कोरोना संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने प्रत्येकाच्या शरिरात आरोग्यवर्धक औषधे जाण्याची आवश्यकता आहे.म्हणूनच या हळदीचे वितरण सर्वच घरात जाण्यासाठी आज आम्ही हा सुभारंभाचा उपक्रम करण्याचा प्रयत्न केला असल्याचे सरपंच सौ.अलका म्हात्रे यांनी म्हटले आहे.

कोप्रोली ग्रामपंचायतीच्या कार्यालयात राबविण्यात आलेल्या या उपक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते सतिश म्हात्रे, निवृत्त शिक्षक आर.के.म्हात्रे, शांताराम पाटील यांच्यासह कोप्रोली ग्रामपंचायतीचे सदस्य व सदस्या, ग्रामसेवक प्रविण खैरे, यांच्यासह कोप्रोली ग्रामपंचायतीचे कर्मचारी वर्ग दिव्यांग लाभार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

खारघरमध्ये मंगळसूत्र खेचून दुचाकीवरून पसार

दै.रायगड नगरी । पनवेल

रस्त्यावरून पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या व्यक्तीने खेचून नेल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे. रोहिणी लंकेश्वर (वय-३०) या खारघर से.-१२ मध्ये कुटूंबासह राहतात त्या आपल्या मुलासह औषध आणण्यासाठी गेल्या होत्या. औषधे घेतल्यानंतर त्या पायी चालत आपल्या घरी जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून पसार झाले.

दानपेटीतील रोख रक्कम केली चोरट्यांनी लंपास

दै.रायगड नगरी । पनवेल

अज्ञात चौकडीने कामोठे से.-८ मधील शिवशंकर मंदिराचे टाळे तोडून मंदिरातील दान पेटीसह रोखरक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. कामोठे पोलिसांनी या चौकडीविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

कामोठे से.-८ मध्ये शिवशंकर मंदिर असून या मंदिराचे पुजारी दरदिवशी रात्री १०.३० वाजता मंदिर बंद करून कुलूप लावतात.

तसेच नियमित सकाळी ५ वाजता मंदिर उघडतात. पुजारी नेहमीप्रमाणे मंदिर बंद करून गेले होते. मात्र पहाटे अज्ञात चौकडीने या मंदिराचे टाळे तोडून दान पेटीसह रोखरकमेसह चोरून नेली. पहाटे पुजारी मंदिर उघडण्यासाठी आल्यानंतर मंदिराचे टाळे तोडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मंदिरात लावलेल्या सीसीटीव्हीची तपासणी केली असता चार चोरांनी चोरी केल्याचे निदर्शनास आले.

अर्जदारातर्फे वकील
समीर राम कुंभार

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्यु.डी.मॅजी वर्ग १ ला सो. यांचे कोर्टात
क्रि.चौ.अर्ज क्र.२१०/२०२१
ने.ता.१७/०३/२०२१

श्री.पुडलिक चंदर सवार
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
रा.कातकर वाडी, वाकडी, पो.मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे आजोबा कै.सखाराम बाळ्या कातकरी हे दि.१५/०३/१९८५ रोजी मौजे : रिघटर (आदिवासी वाडी), ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेलेले आहे. कारण त्यांचा मृत्यू मौजे : रिघटर (आदिवासी वाडी), ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. सबब अर्जदार श्री.पुडलिक चंदर सवार यांचे आजोबा कै.सखाराम बाळ्या कातकरी यांचे मृत्यूची नोंद केलेली नाही. सबब अर्जदार श्री.पुडलिक चंदर सवार यांचे आजोबा कै.सखाराम बाळ्या कातकरी यांचा मृत्यू दि.१५/०३/१९८५ रोजी झालेला आहे. जन्म मृत्यू नोंदणी कायदा अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांना योग्य ते आदेश देण्याबाबत नामदार कोर्टाने अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचा मृत्यू नोंदीचा आदेश देण्यासबंधी कोणाही कोणाच्याही कसल्याही इसमाच्या कोणत्याही हरकती आल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार श्री.पुडलिक चंदर सवार यांचे आजोबा कै. सखाराम बाळ्या कातकरी यांच्या मृत्यूचे नोंदीचा आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सहीशिक्क्याने दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

अर्जदारातर्फे वकील
समीर राम कुंभार

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्यु.डी.मॅजी वर्ग १ ला सो. यांचे कोर्टात
क्रि.चौ.अर्ज क्र.२१६/२०२१
ने.ता.०७/०३/२०२१

श्री.बळीराम भाग्या वाघ
वय : ६८ वर्षे, धंदा : शेती
रा.वाकडी, पो.मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार श्री.बळीराम भाग्या वाघ यांचे काका कै. नथु सित्या कातकरी हे दि.२२/०७/१९८४ रोजी मौजे : रिघटर (आदिवासी वाडी), ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेलेले आहे. कारण त्यांचा मृत्यू मौजे : रिघटर (आदिवासी वाडी), ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. सबब अर्जदार श्री.बळीराम भाग्या वाघ यांचे काका कै.नथु सित्या कातकरी यांचे मृत्यूची नोंद केलेली नाही. सबब अर्जदार श्री.बळीराम भाग्या वाघ यांचे काका कै.नथु सित्या कातकरी यांचा मृत्यू दि.२२/०७/१९८४ रोजी झालेला आहे. जन्म मृत्यू नोंदणी कायदा अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांना योग्य ते आदेश देण्याबाबत नामदार कोर्टाने अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचा मृत्यू नोंदीचा आदेश देण्यासबंधी कोणाही कोणाच्याही कसल्याही इसमाच्या कोणत्याही हरकती आल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार श्री.बळीराम भाग्या वाघ यांचे काका कै.नथु सित्या कातकरी यांच्या मृत्यूचे नोंदीचा आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सहीशिक्क्याने दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

राव साहेब
अॅड.ठाकूर

जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), पनवेल यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.३३१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०४/२०२१

१) सौ.सावित्री मधुकर खारकर
वय : सुमारे ५५ वर्षे, व्यवसाय : घरकाम
२) सौ.जनता दिपक खारकर
वय : सुमारे ४७ वर्षे, व्यवसाय : घरकाम
दोघी राहणार : मु.वहाळ,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार

वरील अर्जदाराचे वडील मयत रघुनाथ गोविंद पाटील हे कोणतेही मृत्यूपत्र न करता दि.१२/०७/२०१७ रोजी मौजे : वहाळ, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत.

मयत रघुनाथ गोविंद पाटील, यांच्या नावे असलेल्या मौजे : पाडेघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचा तपशिल :-

गांव	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र सुमारे ऐ.गुंठे.आणे
मौजे पाडेघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड	२६	४० अ	८	०-०२-३
मौजे पाडेघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड	२६	४० क	३	०-११-६
मौजे पाडेघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड	२६	४४ ब	१	०-१-६

सदरहू मिळकतीची किंमत सुमारे ८,२५५/-

मयत रघुनाथ गोविंद पाटील, ह्यांच्या वारसाबाबत उक्त अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशा लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२६ माहे फेब्रुवारी, २०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब कोर्ट
अॅड.प्रणाली सोहनी

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/०४/२०२१

१) श्री.अशोक मंगल निघूकर
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.सुखदेव मंगल निघूकर
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.प्रकाश मंगल निघूकर
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.भानुदास मंगल निघूकर
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार नं.१ ते ४ सर्व रा.घोट,
पो.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.आनंदी शंकर पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बदलापूर पाईप लाईन रोड,
खोणी, ठाणे ४२१३०१
६) सौ.श्रद्धा प्रकाश भोईर
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दिवा ईस्ट, शिल रोड,
खर्डी गांव, ठाणे ४००६१२
७) कै.उदय मंगल निघूकर यांचे वारस
७/१) श्रीमती.मिनाक्षी उदय निघूकर
वय : ३१ वर्षे, धंदा : गृहिणी
७/२) कु.कशिश उदय निघूकर
वय : १२ वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार नं.७/२ ची अ.पा.क.आई
अर्जदार नं.७/१ श्रीमती.मिनाक्षी निघूकर
८) श्रीमती.देवकीबाई मंगल निघूकर
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार नं.७/१ ते ८ सर्व रा.घोट
पो.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ७ यांचे वडील व अर्जदार नं.८ यांचे पती कै.मंगल हडकू निघूकर हे दि.४/८/२०२० रोजी मु.घोट, पो.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार १ ते ८ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.मंगल हडकू निघूकर यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

गाव	यु.के.नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
चाळ	५१/११३	४५	६	०-६१-७

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.मंगल हडकू निघूकर यांस गांवठाण विस्तार योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड कै.मंगल हडकू निघूकर यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अज्रदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२५/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पाठक साहेब
अप्रो.जमा रुपये ५०/- वकील धनंदा ज. ठाकूर
वकील राजकुमार व्ही. जाधव

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२११/२०२१
नि.नं.८
ने.ता.०७/०४/२०२१

१) श्री.लक्ष्मण गजानन पाटील
रा.रुम नं.०३, घर क्र.११५, श्री राम समर्थ बिल्डींग,
आनंदनगर, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.भरत गजानन पाटील
रा.घर क्र.जी-११५, सुंदर निवास, पालवी हॉस्पिटल,
जुना एस.टी.स्टॅण्ड समोर, ता.उरण, जि.रायगड
३) श्री.गणेश गजानन पाटील
रा.घर क्र.जी-११५, सुंदर निवास, नेरेकर बिल्डींग जवळ,
जुना एस.टी.स्टॅण्ड समोर, ता.उरण, जि.रायगड
४) श्री.हनुमंत गजानन पाटील
रा.८६२, गणेश नगर, केगाव, ता.उरण, जि.रायगड
५) श्री.नारायण गजानन पाटील
रा.घर क्र.११५, सुंदर निवास,
जुना एस.टी.स्टॅण्ड समोर, ता.उरण, जि.रायगड
६) मयत कै.आत्माराम गजानन पाटील
यांचे वारस व उत्तराधिकारी
६/१) श्रीमती.गिरीजा आत्माराम पाटील
रा.घर नं.११५ ग, उरण-रायगड
६/२) श्री.संजय आत्माराम पाटील
रा.सी/१०७, मंगेशी सिटी, मोहन कुंज, कोलीवली रोड,
श्री कॉम्प्लेक्स जवळ, कल्याण (प.) ठाणे
६/३) श्री.रत्नाकर आत्माराम पाटील
रा.घर नं.११५ जी, सुंदर निवास, करंजा रोड,
विठ्ठल मंदिर जवळ, पालवी हॉस्पिटल समोर,
जुना एस.टी.स्टॅण्ड, उरण, रायगड
६/४) अंजली आत्माराम पाटील
(लग्नानंतरचे नाव श्रीमती.अंजू मनोज गायकवाड)
रा.सुंदर निवास, करंजा रोड, पालवी
पालवी हॉस्पिटल जवळ, उरण, जि.रायगड
७) श्रीमती.तुळसाबाई दत्तू शेळके
मु.पो.आदई, गाव देवी मंदिरजवळ, ता.पनवेल, जि.रायगड
८) श्रीमती.मुक्ता नामदेव ठाकूर
रा.घर नं.६४५, कांबलेदेव जवळ, केगाव,
आवेडा, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

वरील अर्जदार क्रं.१ ते ५ आणि ७, ८ यांची आई, अर्जदार क्रं.६/१ यांची सासू आणि अर्जदार क्र.६/२ ते ६/४ यांची आजी मयत कै.सुंदर गजानन पाटील यांचे निधन दि.१९/०९/२०१२ रोजी मु.सुंदर निवास, पालवी हॉस्पिटल समोर, जुना बस स्टॅण्ड, ता.उरण, जि.रायगड येथे झाले. सदर मयत कै.सुंदर गजानन पाटील यांचे १/९ हिश्श्याचे हक्क, हितसंबंध व आधिकार असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

संपादीत करण्यात आलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन

गावाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
ओवळे	१६८	३ क	०-३२-०	८.१२

वरील मिळकतीबाबत वरील अर्जदारांनी त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांचे तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस (३०) दिवसांचे आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसलयास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२६/०१/२०२१ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

पाली बलाप बायपास भूसंपादन प्रक्रियेत एकाही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही : आ.रवींद्र पाटील

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

नव्याने निर्माण होत असलेल्या पाली बलाप, झाप बाह्यमार्ग वळण रस्त्याला (बायपास) स्थानिक शेतकरी व नागरिकांनी कडाडून विरोध दर्शविला आहे. प्रशासनाने विश्वासात न घेता बायपास मार्गाची कार्यवाही सुरू केली असून या प्रक्रियेत आमच्यावर अन्याय होत असल्याचे म्हणणे शेतकऱ्यांनी प्रकर्षाने मांडले आहे. अशातच पाली बलाप बायपास भूसंपादन प्रक्रियेत एकाही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही अशी भूमिका पेण सुधागड रोहा मतदारसंघाचे आमदार आमदार रविशेठ पाटील यांनी दि.(२६)शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केली आहे. आ. रवींद्र पाटील यांनी म्हटले आहे की अष्टविनायक धार्मिक तीर्थ क्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या व पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणाऱ्या पालीतील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत आहे. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी राज्य व देशभरातून मोठ्या संख्येने भाविक पालीत दाखल होतात, तसेच परिसरातील विविध निसर्गरम्य पर्यटन स्थळे , लेण्या, ऐतिहासिक वास्तू गड किल्ले, गरम पाण्याचे कुंड, धबधबे येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या देखील मोठी आहे. पालीतील लोकसंख्या दिवसागणिक विस्तारत आहे. येथील जुने व अरुंद रस्ते यामुळे अनेक अडचणींना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. पाली सह परिसराच्या विकासासाठी पाली बलाप बायपास मार्ग होणे काळाची गरज आहे. मात्र अशातही बाह्य वळण मार्ग होत असताना स्थानिक शेतकऱ्यांच्या काही तक्रारी समोर आल्या आहेत. शेतकरी व स्थानिक नागरिकांची भूमिका समजून घेण्यासाठी लवकरच पाली तहसिल कार्यालयात प्रशासन, शेतकरी यांची बैठक बोलावणार आहे. यावेळी शेतकऱ्यांना योग्य तो न्याय देण्याची भूमिका घेतली जाईल , एकाही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही अशी न्यायिक भूमिका घेतली जाईल. असे रवींद्र पाटील, आमदार पेण सुधागड रोहा मतदारसंघ यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

बुडत्याला वाचविले, आदिवासी तरुणाने केले मोठे 'धाडस '

दै.रायगड नगरी । रोहा

त्यांनी पाहिले, थोडा दचकला, पण लगेचच क्षणाचाही विचार न करता नदीत उडी घेतली. मोठ्या विश्वास आणि जिद्दीने आपल्यापेक्षा दुप्पट वजनदार तरुणाला पाण्याच्या जोरदार प्रवाहात पकडले. अत्यंत चपळाईने त्या तरुणाला काठावर आणले. त्याचे जीव वाचविले. सर्वच प्रसंग अगदी रोमांच आणणारा. तो भिणारा नाही, स्वतःच्या जिवाची पर्वा करणारा नाही, ही घटना रोहा तालुक्यात घडली असून सद्या सर्वत्र चर्चेला विषय ठरली आहे. बुडत्याला वाचविणाऱ्या त्या आदिवासी तरुणाचे कौतुक सर्वत्र होत आहे. राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे यांनी दिलीप वाघमारे याच्या धाडसाचे कौतुक करीत रोख रक्कम देत त्याचा यथोचित सन्मान केला आहे.

धाटाव गावाच्या हद्दीतील कुंडलिका नदीवर शनिवारी दुपारी अत्यंत धक्कादायक घटना घडली. मुंबईहून बाहे गावी मित्राकडे आलेल्या तीन तरुणांपैकी दोघांचा कुंडलिका नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने ही खळबळजनक घटना घडली. एक जण बुडत असताना त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात दोघेजण प्रवाहासोबत वाहू लागले. त्याच प्रयत्नात दुसरा वाचविणाराही वाहून गेला. तर दुसऱ्या एकाला बुडता बुडता शेजारील वाडीत काम करणाऱ्या तरुण दिलीप वाघमारे याने तिघेही बुडत आहेत हे लक्षात येताच थेट नदी पात्रात उडी घेतली. त्याने मागाहून वाहून जाणाऱ्या तरुणाला वाचविले. इतर दोघे प्रवाहासोबत खुप पुढे गेले. भयानक प्रसंग खुद्द दिलीप वाघमारे यांनी सांगितला. वाघमारे याच्या धाडसाचे कौतुक करीत राष्ट्रवादीचे सरचिटणीस विजयराव मोरे यांनी रोख रक्कम देउन मदतीचा हात देत सन्मान केला. यावेळी जिल्हाकार्याध्यक्ष मधुकर पाटील यांच्या हस्ते यथोचीत त्याचा सन्मान करण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख, प्रेस क्लबचे अध्यक्ष शशिकांत मोरे, उद्योजक राकेश मोरे आदी उपस्थित होते. मुंबईतील तरुणाला जीवदान दिल्याने त्याच्या कुटुंबीय, मित्रांनी ऋण व्यक्त केले. वाघमारे याच्या धाडसाची दखल धाटाव येथील नेते विजयराव मोरे यांनी घेतली. पत्रकार व विविध क्षेत्रातील मान्यवरांना बोलावून वाघमारे याचा सन्मान घडवून आणला.

महाराष्ट्राच्या ५४व्या निरंकारी संत समागमाचा भव्य शुभारंभ

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

सत्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन सानिध्यात महाराष्ट्राच्या ५४व्या तीन-दिवसीय प्रादेशिक निरंकारी संत समागमागमाचा भव्य शुभारंभ हर्षोल्हासपूर्ण वातावरणात आज २६ फेब्रुवारी, २०२१ रोजी 'सम्पूर्ण अवतार बाणी' तसेच 'सम्पूर्ण हरदेव बाणी'च्या पावन पदांच्या गायनाने झाला.

समागमाचे प्रसारण व्हर्च्युअल रूपात सायंकाळी ५.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत निरंकारी मिशनची वेबसाईट आणि संस्कार टी.व्ही. चॅनलवर होत असूनत्याचा आनंद जगभरातील समस्त भाविक भक्तगण आणि प्रभुप्रेमी सज्जन प्राप्त करतील. या कार्यक्रमामध्ये सद्गुरुच्या पावन दर्शनाबरोबरच भक्तीसंगीत आणि व्याख्यानांच्या माध्यमातून संत-महात्म्यांचे ओजस्वी व प्रेरणादायी विचार श्रवण करता येतील. या वर्षी कोरोना महामारीमुळे समागमाची व्यवस्था व्हच्र्युअल रूपात अशा प्रकारे करण्यात आली आहे ज्यायोगे भक्तगणांना तशीच अनुभूती यावी जशी खुल्या प्रांगणातील समागम मंडपामध्ये बसून मिळते.

या वर्षी समागमाचा मुख्य विषय 'स्थिरता'ठेवण्यात आला आहे. मान-वतेने युक्त सहज, सरळ व सुंदर जीवन जगण्यासाठी जीवनातील प्रत्येक पैलूमध्ये स्थिरतेची नितांत आवश्यकता आहे. मग ही स्थिरता आहे तरी काय? ती प्राप्त करण्याचा उपाय कोणता आणि मानवी जीवनाशी तिचा संबंध तरी काय आहे? या सर्व तथ्यांच्या बाबतीत समागमाच्या तिन्ही दिवशी वेगवेगळ्या माध्यमांतून चर्चा केली जाईल. प्रत्येक दिवसाच्या कार्यक्रमाच्या शेवटी सत्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचे अमृतमय प्रवचन होईल.

पूर्वेतिहास पाहिला तर दरवर्षी समागमाचा प्रारंभ महाराष्ट्राच्या विविध भागांसह देशाच्या इतर प्रांतांतील लोकसंस्कृतींचे प्रतिनिधित्व करत अनेकतेत एकतेचे दर्शन घडविणाऱ्या रंगीबेरंगी शोभायात्रेद्वारे होत आला आहे. तथापि, या वर्षी समागमामध्ये मराठी भाषा आणि महाराष्ट्रातील वेगवेगळ्या बोलीभाषांसह देशातील अन्य भाषांच्या माध्यमातून भक्तीगीते, अभंगवाणी, कविता आणि व्याख्यानांच्या माध्यमातून अनेकतेत एकतेचा अद्भुत संगम पहायला मिळेल ज्यातून सर्वांना सद्भाव आणि एकत्वाची प्रेरणा प्राप्त होईल.

मनसेतर्फे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध

दै.रायगड नगरी । उरण

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे आणि शासनाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या सल्ल्याने गुरुवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी मनसेच्या वतीने जेष्ठ नागरिक सभागृह नवीन पनवेल येथे घेण्यात येणारा नोकरी व व्यवसाय मेळावा कार्यक्रम रद्द करण्यात आला होता. सदर निरोप सर्व लोकांकडे न पोहचल्या कारणाने सुमारे १५० बेरोजगार तरुण तरुणी सोशल व फिजिकल डिस्टन्स पाळून ह्या ठिकाणी उपस्थित झाले होते. ह्या बेरोजगार जनतेला उत्तर देण्याकरिता व त्यांची माहिती घेण्या करिता, मनसे रोजगार विभागाचे अध्यक्ष महेंद्र बैसाणे, मनसे रोजगार विभागाचे रायगड जिल्हा संघटक रामदासभाई पाटील आणि खालापूर तालुका संघटक संजय तन्ना उपस्थित होते.ह्यावरून असे कळते की जनतेला लोकडाऊन आणि कोरोनाची चिंता नसून स्वतःच्या रोजगाराची व पोटापाण्याची चिंता आहे.आणि ह्या चींतेपासून मुक्त होण्याकरिता ह्या बेरोजगार लोकांना रोजगार मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नक्कीच प्रयत्न करत आहे. ह्या ठिकाणी रिलायन्स स्मार्ट ह्या समूहाने ५० तरुण तरुणींचे बायोडाटा निवडले आहे व त्यांना ह्या समूहाकडून त्वरित नोकरी देण्यात येईल अशी ग्वाही दिली आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेना रोजगार विभाग रायगड जिल्हाचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.बेरोजगारांना नोकरीं मिळाल्याने बेरोजगार युवकांनी मनसेचे आभार मानले.

पोलादपूर तालुक्यात लवकरच ज्येष्ठ नागरिकांनाही कोविशिल्ड लसीकरण : डॉ.राजेश शिंदे

दै.रायगड नगरी । पोलादपूर

पोलादपूर तालुक्यात गेल्या आठ महिन्यांच्या काळात कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर आरोग्य कर्मचाऱ्यांनी केलेल्या महत्वपूर्ण सेवा आणि कर्तव्याच्या पार्श्वभूमीवर या अग्रभागी असलेल्या कोरोना योध्यांपासून कोरोना प्रतिबंधक कोविशिल्ड लसीकरणाची सुरूवात कोरोना योध्दा डॉ. राजेश शिंदे यांनी स्वतपासून सुरू केल्यानंतर आतापर्यंत निर्धारित शासकीय व निमशासकीय स्तरावरील तब्बल ७० टक्के लसीकरण पूर्ण झाले असून लवकरच पोलादपूर तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनाही कोविशिल्ड लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती आयुष चे डॉ.राजेश शिंदे यांनी येथे दिली.

दि.९ फेब्रुवारी २०२१ पासून कोविशिल्ड लसीकरणाची सुरूवात झाली. पोलादपूर तालुक्यातील सुमारे २०३ जणांना कोविशिल्ड लस देण्याच्या पहिल्या टप्प्यात डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि आशासेविका यांचा समावेश करण्यात आला. पोलादपूर तालुक्याचे प्रभारी तहसिलदार समीर देसाई यांनी शुक्रवारी आरोग्य कर्मचारी, सरकारी कर्मचारी माध्यमिक शिक्षक, प्राथमिक शिक्षक आणि अन्य शासकीय कर्मचाऱ्यांसोबत कोविशिल्ड लसीकरण करून घेतले. यावेळी पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये डॉ. राजेश सलागरे आणि डॉ.राजेश शिंदे यांनी सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत उपस्थित राहून लसीकरणाच्या कामाबद्दल सुसज्जता ठेवली. २३५ जणांना कोविशिल्ड लसीकरण करण्यात आल्याची माहिती देताना डॉ.शिंदे यांनी सुमारे ७२ टक्के लसीकरण पूर्ण झाले असून निर्धारित लसीकरणानंतर लवकरच पोलादपूर तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनाही कोविशिल्ड लसीकरण करण्यात येणार आहे,असे यावेळी डॉ. राजेश शिंदे यांनी सांगितले.कोविशिल्ड लसीकरणाचा पहिला डोस घेतल्यानंतर २८ व्या दिवशी पुन्हा दुसरा डोस दिला जाणार आहे, अशी माहिती यावेळी दिली.

पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी कोविशिल्ड लसीकरणासाठी स्वतंत्र कक्ष सुरू केले असून आरोग्य कर्मचारी आणि सुरक्षारक्षक यांनी संपूर्ण लसीकरण कक्षामध्ये सॅनिटायझर आणि मास्कविना प्रवेशबंदीचे धोरण अवलंबून दक्षता घेतली आहे.

माथेरानच्या पर्यटनावर कोरोनाचा प्रभाव नाही

दै.रायगड नगरी । माथेरान

राज्यात वाढू लागलेली कोरोना रुग्णाच्या संख्येमुळे सर्वत्र पुन्हा एकदा लॉक डाऊनचे सावट असताना माथेरानला मात्र पर्यटकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे.

राज्यात कोरोना रुग्णाची संख्या दिवसेनदिवस वाढत असताना माथेरानचे प्रशासन व व्यावसायिकांच्या सावधगिरीमुळे येथील पर्यटन मात्र सुरक्षित झाले आहे. त्यातच येथील प्रदूषणमुक्त वातावरण सध्याच्या काळात सर्वांसाठी पोषक असल्याने माथेरानमध्ये पर्यटकांची रीघ लागलेली दिसून येत आहे. आलेले पर्यटक व स्थानिक ही सुरक्षिततेचे सर्व नियम पाळत असल्याने हे पर्यटनस्थळ कोरोनामुक्त पर्यटनस्थळ आहे.

माथेरान मध्ये गुलाबी थंडी चे दिवस असल्याने येथील वातावरण पर्यटनास पोषक आहेच पण सध्या च्या काळामध्ये येथील कृत्रिम ऑक्सिजन च्या ऐवजी लोकांना शुध्द हवेसाठी माथेरान इतके सुरक्षित ठिकाणी मुंबई व पुणे या शहरांपासून जवळ दुसरे सापडणार नाही. त्यातच कोरोनाचा धोका लक्षात घेता माथेरान अधिक सुरक्षित असल्याने पर्यटकांची पहिली पसंती ठरत आहे माथेरान पालिकाही येथील पर्यटन सुरक्षित राहावे ह्या करिता प्रयत्नशील असून घरोघरी जाऊन ध्वनीशेपकाद्वारे सॅनिटायजर व मास्क वापरण्याचे आव्हाहन करीत असताना कुठेही दुर्गंधी होणार नाही ह्याकडे स्वतः मुख्याधिकारी प्रशांत जाधव जातीने लक्ष ठेऊन आहेत. तर पालिकेचे कर्मचारीही येणाऱ्या पर्यटकांना मास्क वापरा असा संदेश देत असल्याने पर्यटक ही सुरक्षिततेच्या बाबतीत आनंदी दिसून येत आहेत. तसेच माथेरानचे पोलीस अधिकारीही येथील व्यावसायिकांना भेट देऊन सुरक्षिततेचे नियम पाळले जात असल्याची खात्री करून घेत आहेत. त्यामुळे येथील पर्यटन सुरक्षित असल्याने येथे ह्या दिवसातही पर्यटक मोकळी हवा घेत आहेत

कृत्रिम पाणी टंचाई करून जनतेला वेठीस धरणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची करावा : भरत पाटील

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका व सिडको नोडमध्ये कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून जनतेला वेठीस धरले जाते, याबाबत पोलिसांमार्फत गुन्हा दाखल करून चौकशी करण्याची मागणी शिवसेना पनवेल तालुका संघटक भरत पाटील यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पनवेलसह नवी मुंबई व परिसरातील गावे पाण्यांपासून वंचित राहू नये म्हणून महाराष्ट्र शासनाने पेण तालुक्यातील मौजे हेटवणे गावात , हेटवणे धरणाची निर्मीती करून नवी मुंबई व आसपासच्या गावांना मुबलक पाणी पुरवठा देत असल्याचे चित्र सिडकोने उभे केलेले आहे तसेच नवी मुंबई महानगरपालिकेने स्वत:चे मोर्वे धरण विकत घेतले आहे. त्या धरणातून नवी मुंबईसाठी पाणी पुरवठा होतो म्हणजे सध्या होत असलेला पाणी पुरवठा हा हेटवणे धरणातून देणेत येणा या पाणी पुरवठयातून वजा केल्यास पाण्यांची पुरवठा क्षमता अधिक राहील व कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही नवी मुंबई , पनवेल ग्रामीण , महानगरपालिका व सिडको परिसरात भीषण पाणी टंचाई आहे ही वाव सायबर सिटी म्हणून नांव लौकीक असलेल्या सिडकोसाठी अतिशय शरमेची असून गंभीर स्वरूपाची आहे परंतु पनवेल तालुक्यातील महानगरपालिका सिडको समाविष्ट नोडसमध्ये पाणी पुरवठा टॅन्कर लॉवी अतिशय प्रभावी आहे , जेणे करून नवी मुंबईत होणा या पाणी पुरवठ्यात ठेकेदार व प्रशासनातील अधिका यांच्या संगणमताने व्यत्यय आणून कमी दाबाने पाणी पुरवठा कसा होईल हे पाहिले जाते , त्यानंतर टॅन्कर लॉबी उभी राहाते सध्या सिडको प्रशासन नवीन बांधकामांना परवानगी देत आहे.

त्यावेळी त्या इमारतीचे बांधकामासाठी लागणारे पाणी कुठून आणायचे यावर सुतोवाच नाही विकासक हे नवीन इमारतीचे बांधकाम करताना टॅन्कर लॉबीला हाताशी धरून मनमुराद पाणी पुरवठा उपलब्ध करून घेतला जातो , त्यामुळे नवी मुंबईतील खारघर , तळोजा कळंबोली , कामोठे , नवीन पनवेल , पनवेल , उत्नवे येथे भीषण पाणी टंचाई दरवर्षी निर्माण होत आहे या कृत्रिम भीषण पाणी टंचाईला सर्वस्वी टॅन्कर लॉबी पाणी पुरवठा देखभाल करणारे ठेकेदार , व प्रशासनातील झारीतील शुक्राचार्य जवाबदार आहेत याबाबत दुमत नाही मागील वर्षी मार्च २०२० पासून कोरोना महामारीची दहशत असताना पाणी पुरवठा व्यवस्थित व मुबलक प्रमाणात उपलब्ध होत होता.

त्यावेळी पाणी टंचाई निर्माण झालेली नाही परंतु सध्या पनवे महानगरपालिका , सिडको नोडस् व ग्रामीणा परिसरात पाणी प्रश्न पेटलेला असून जानेवारी महिन्यातच भीषण पाणी टंचाईचे चित्र उभे केले जात आहे यावाबत आपल्या अधिका यांना योग्य सुचना देवून टॅन्कर लॉबी , ठेकेदार , ब प्रशासनातील जबाबदार अधिकारी यांच्यावर फौजदारी केसेस दाखल करून त्या गुन्हयांचा तपास करून टॅन्कर लॉबी , ठेकेदार व त्यांना मदत करणारे प्रशासनातील अधिकारी यांची जाहिर चौकशी करून कायदेशीर कारवाई करणे आवश्यक व गरजेचे आहे जेणे करून कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होणार नाही.

पेण येथे शिक्षकांसाठी कायदे विषयक कार्यशाळा संपन्न

दै.रायगड नगरी । पेण

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी महिला व बालकांचे कायदे विषयक कार्यशाळा पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष मंगेश नेने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उज्वला पाटील, जिल्हा संरक्षण अधिकारी सुजाता सपकाळ, बालकल्याण समिती सदस्य तानाजी पाटील, निता कदम, पेण नपा प्रशासनाधिकारी माने, परिविक्षाधीन अधिकारी दिनेश मिश्रा, बालकल्याण समिती सदस्या शुभांगी झेमसे आदी यावेळी उपस्थित होते.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाल, वरसई वडखळ, पेण येथील माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा महाविद्यालय यांच्या सह पेण नगरपालिका शाळा असे एकंदरीत १०० ते ११० शिक्षक यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सरकारी वकील ॲड.वर्षा मॅडम यांनी सांगितलं की, पोस्को कायदा २०१२ साली आला असून हा कायदा मुलींसाठी आहे. मात्र या कायद्याचा वापर सद्यस्थितीत जास्त होत नसल्यामुळे आजही आई-बाबा या कायद्याला दबकूनच आहेत. तर नीता कदम यांनी बाल अधिनियम कायदा कसा तयार झाला त्या संदर्भात योग्य माहिती दिली तसेच मागील दोन घटनांनी पेण हादरून गेलं ही विकृत मानसिकता असल्याचे सांगितले. रायगडमध्ये कर्जत येथे एक शासकीय व ६ खाजगी बालगृहे आहेत. तर मंगेश नेने यांनी सांगितले की, चांगल्या घटना घडाव्यात वाईट घडू नये यासाठी आणि शिक्षकांसाठी खास प्रशिक्षण आहे. आमच्या संस्थेच्या शाळांमध्ये ९ हजार विद्यार्थी शिकत असून आमच्या शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी कॉन्सिलरची नितांत आवश्यकता आहे. ती लवकरच आपण पूर्ण करावी अशीही मागणी केली. तर उज्वला पाटील यांनी सांगितले की बालकांसाठी संरक्षण कायदा विधी संरक्षण बालक कसा शोधणे व त्यावर काय उपाय करावेत याविषयी सविस्तर माहिती दिली. तर दिनेश मिश्रा यांनी मुलींचे संरक्षण तसेच बालगृहासंदर्भात माहिती देऊन शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.